**International Journal of Academic Research and Development**
**ISSN: 2455-4197, Impact Factor: RJIF 5.22**
**www.newresearchjournal.com/academic**
**Volume 1; Issue 4; April 2016; Page No. 24-26**

# दलित पिडीत महिलातील जागृती, दबाव व न्यायालयीन प्रक्रियेतील विलंबाचा विश्लेषनात्मक अभ्यासरू संदर्भ जालना व औरंगाबाद जिल्हा

**[1] डॉ0 शेख नजीर जब्बार, [2] प्रा0 नरसिंग आबासाहेब पवार**

**[1] मार्गदर्शक, मानवलोक समाज विज्ञान महाविद्यालयए अंबाजोगाई**

**[2] संशोधक, शंकररावजी चव्हाण कॉलेज ऑफ सोशल सायन्स ऍन्ड रिसर्चए रामनगर जालना**

**प्रस्तावना**

दलित महिला बहुआयामी अत्याचारास बळी पडलेल्या दिसुन येतात कधी स्त्रि म्हणुन तर कधी जात, धर्म, वर्ग, इत्यादीच्या प्रभावाखाली त्यांच्यावर अत्याचार करण्यात येते. अशा स्थितीत दलित महिलांना न्याय मिळण्यात अनेक अडथळे/अडचणी येतात व कधीकधी न्याय मिळणे दुरापस्त होते. अत्याचार करणाऱ्या व्यक्ती उपलब्ध असलेल्या सर्वच प्रकारच्या स्त्रोतांचा वापर करुन पिडीतेस न्यायापासुन वंचित ठेवण्याचा प्रयत्न करतात. दलित महिलांच्या न्यायाची प्रक्रिया पोलीस स्टेशन मध्ये तक्रार दाखल करण्यापासुन सुरु होते व न्यायालयाच्या निर्णयाने प्रकरण संपते.संबंधित प्रकरणात न्यायालय दोषी व्यक्तीस शिक्षा देते अथवा त्यांना मुक्त करते.न्यायालयाचा निकाल येईपर्यंत पिडीतास न्यायदानाच्या विविध प्रक्रियेतुन जावे लागते.

**अत्याचार प्रतिबंध कायदयाविषयी जागृती**

अनुसूचित जाती जमातीच्या व्यक्तीवर होणाऱ्या विविध प्रकारच्या अत्याचारांना प्रतिबंधीत करण्यासाठी व अत्याचार करणाऱ्या व्यक्तीवर खटले चालविण्याकरीता विशेष न्यायालय स्थापन करण्यास्तव हा कायदा अस्तित्वात आला. तसेच अत्याचारास बळी पडलेल्या लोकंाना अर्थिक सहाय्य करण्यासाठी व त्यांचे पुर्नवसन करण्यासंबधी या कायदयात विविध तरतुदीचा समावेश करण्यात आलेला आहे. या महत्वाच्या कायदयाविषयी पिडीता अत्याचारापुर्वी अज्ञान दिसुन येते, त्यांना कायदयातील तरतुदी व यातील अंतरभुतयंत्रणाची कोणतीही माहिती नव्हती (पहा सा.क्र. 4.1)

**उद्दिष्ट्ये**

1. पिडीत महिलांत कायदेविशयक जागृतीचा अभ्यास करणे.
2. तक्रार मागे घेण्या करिता टाकण्यात येणारा दबाव व त्याचे स्वरूप यांचे अध्ययन करणे.
3. न्याय प्रक्रियेतील विलंबाच्या कारनांचे विश्लेषण करणे.

**संशोधन पध्दती**

**अध्ययन क्षेत्र व अध्ययन विश्व**

प्रस्तुत संशोधनासाठी जालना व औरंंगाबाद जिल्हयाची निवड करण्यात आलेली असुन वषे 2000 ते 2011 या कालावधीतील ज्या दलित महिलांवर अत्याचार झालेला असुन त्या संदर्भात न्याय मिळविण्याच्या दृष्टीकोणातुन ज्यांनी पोलीस स्टेशनमध्ये अनुसूचित जाती व जमाती अत्याचार प्रतिबंधक कायदा 1989 अंतर्गत तक्रार नोंदविलेली आहे अशाच दलित महिलांचा समावेश अध्ययनात करण्यात आलेला आहे.

सदरील संशोधन अभ्यासासाठी जालना व औरंगाबाद जिल्हयाची निवड करण्यात आली आहे. महाराष्ट्र शासनाचे विभागीय समाजकल्याण अधिकारी कार्यालय औरंगाबाद यांच्याकडुन प्राप्त झालेल्या माहितीनुसार औरंगाबाद व जालना जिल्हयात 2000 ते 2011 या कालावधीत सवर्णाकडुन एकुण 210 दलित महिलांवर अत्याचार केले गेलेले आहेत. (210 दलित महिलांसोबत अत्याच्याराच्या घटना घडलेल्या आहेत) यातुनच संशोधन अभ्यासासाठी नमुना आकार ठरविण्यात आला आहे.

सदरील संशोधनाचे क्षेत्र हे केवळ जालना व औरंगाबाद जिल्हयापुरतेच मर्यादित असुन इ.स. 2000 ते 2011 या कालावधीत अत्याचारास बळी पडलेल्या ग्रामीण भागातील दलित महिलांच्या शैक्षणिक, आर्थिक व सामाजिक स्थिती, अत्याचाराचे स्वरुप, कारणे, शारीरीक मानसिक व सामाजिक परिणाम, तसेच पिडित महिलांचे अत्याचाराबाबत कार्यरत शासकीय, अशासकीय यंत्रणाविषयीचे मत व कायदेविषयक जागृती पर्यंतच मर्यादीत आहे.

**नमुना निवड**

प्रस्तुत संशोधन विषयास अनुसरुन तथ्य संकलनासाठी एकुण सम्रगातुन संभाव्य नमुना निवड प्रकारातील साधा यादृच्छीक नमुना निवड पध्दतीतील नियमित अंकन तंत्राचा वापर करुन 100 एककाची नमुना म्हणुन निवड करण्यात आलेली आहे. नमुना निवड करण्याकरीता जालना व औरंगाबाद जिल्हयातील अत्याचारास बळी पडलेल्या महिलांची स्वतंत्र यादी तयार करुन नियमित अंकन पध्दतीने प्रत्येकी 50 असे एकुण 100 एककाची निवड करण्यात आली आहे.

**तथ्य संकलन**

प्रस्तुत संशोधनात तथ्य संकलनाकरीता प्राथमिक व दुय्यम स्त्रोतांचा वापर केलेला आहे. प्राथमिक स्त्रोतात संशोधन विषयास अनुसरुन मुलाखत अनुसूची तयार करण्यात आली आहे व अन्याय अत्याचारास बळी पडलेल्या औरंगाबाद व जालना जिल्हयातील दलित महिलांकडुन माहिती भरुन घेण्यात आली. याच बरोबर पिडितांच्या कुंटूंबाबरोबर चर्चा, निरीक्षण, इत्यादी माध्यमांचा वापर तथ्य संकलनासाठी करण्यात आला.

दुय्यम स्त्रोतात संशोधन विषयास अनुसरुन संबंधीत पुस्तके, मासिके, ग्रंथ, नियतकालिके, अहवाल, प्रकाशित लेख, इंटरनेट,जाहीराती इत्यादीचा वापर करून तथ्य संकलन करण्यात आलेले आहे .

**सारणी क्रमांक 1:** ऍट्रासिटी ऍक्ट 1989 विषयी माहिती

| अ.क्र. | विवरण | वारंवारीता | टक्केवारी |
|---|---|---|---|
| 1. | होय | 32 | 32 |
| 2. | नाही | 38 | 38 |
| 3. | काही प्रमाणात | 30 | 30 |
| | एकुण | 100 | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

दलितांवर होणारे अत्याचार प्रतिबंध करण्यासाठी या कायदयाची निर्मिती झाली व या कायदयातील तरतुदीनुसार अत्याचारीत महिलांना न्याय दिला जातो व पोलीसांना या कायदयानुसार कार्यवाही करावी लागते अशी माहिती असणाऱ्या पिडित महिलांची संख्या 32 (32%) आहे काही महिलांना या कायदयातील ठळक तरतुदीची पण माहिती आहे असे निदर्शनास आले आहे. हा कायदा दलितांसाठी आहे या कायदयातील तरतुदीनुसार न्याय मागता येतो वा पोलीस कार्यवाही करतात एवढी त्रोटक माहिती असणाऱ्या पिडीत महिलांचे प्रमाण 30 % आहे.

पंरतु या कायदयाची काहीच माहिती नसणाऱ्या पिडित महलंाचे प्रमाणे सर्वाधिक 38 % आहे.शिक्षण, जागृती व बाहय जगाशी कमी संपर्क या गोष्टी कारणीभुत आहेत.

### पोलीसांची भुमिका

सामाजिक कायदयाच्या अमंलबजावणी पोलीस महत्वाची भुमिका बजावु शकतात.पोलीसांच्या भुमिकेचे विश्लेषण करण्यासाठी 1979 मध्ये पोलीस आयोग गठित करण्यात आले होते. या आयोगाने पोलीसा संदर्भात पुढील निरीक्षणे नोंदविली यात तक्रार नोंदवुन घेण्यास नकार देणे, गुन्हयाच्या ठिकाणी उशिरा जाणे, विशेष प्रकरणात पुर्ण काळजीपुर्वक तपास न करणे, मागासवर्गीय आरोपीसोबत क्रुरता दाखविणे, उच्चवर्णीय व्यक्तीना सौम्य वागणुक देणे इत्यादीचा यात समावेश होतो (National Police Commission 1979).

दलितांच्या हक्कांच्या सरंक्षणासाठी व त्यांच्यावर होणारे अत्याचार प्रतिबंधा संबंधी शासनाने कायदे पारित केले तेव्हापासुन एक गट या कायदयावर टिका करतांना दिसुन येतो.दलितावर होणाऱ्या अत्याचारांना प्रतिबंध करीत असतांना दलितांवरच अत्याचार करत असतांना पोलीस दिसतात. यात पुढील बाबीचा समावेश होतो; 1. कोठडीत मृत्यु 2.सामाजिक चळवळीचे गुन्हेगारीकरण करणे 3.दलित वस्त्यावर छापा टाकणे इत्यादीचा समावेश होतो. पोलीस सुध्दा व्देष भावनेने कृती करतांना दिसतात यात तक्रार नोंदवुन न घेणे, आरोपीबरोबर संगनमत करणे व त्याला मदत करणे, तडजोड करण्यास दबाव टाकणे, चुकीच्या केसेस करणे कायदयातील महत्वाच्या तरतुदीकडे जाणीवपुर्वक दुर्लक्ष करणे, उशिरा चार्जशिट दाखल करणे, इत्यादी (सुब्रमन्यम: 2007).

### पोलीसांच्या सहकार्याविषयी

अत्याचारास बळी पडलेल्या व्यक्तीची तक्रार दाखल करुन घेण्यास पोलीस टाळाटाळ करतात. यास विविध कारणे आहेत जसे की, पोलीस व महसुल विभागातील बहूतेक अधिकारी सवर्ण असतात, पोलीसांना दलितांवरील अन्याय अत्याचार, भेदाभेद इत्यादी विषयी संवेदना नसते, त्यांचा सर्वसाधारण असा समज असतो की, दलितांनीच उच्चवर्णियांना डिवचले असावे. पोलीस दलितांवर झालेल्या अत्याचारावर एक गुन्हा म्हणुन पाहत नाहीत तसेच बहुतेक अधिकाऱ्यांना अत्याचार प्रतिबंध कायदयातील तरतुदीचीच माहिती नसते.गुन्हेगाराच्या जातीतील लोकप्रतिनिधी व स्थानिक स्तरावरील राजकारणी पोलीसांवर दबाव टाकतात (साक्षी हयुमन राईट वॉच - आंध्र प्रदेश, सिकंदराबाद 2000, पा.क्र. 100-140).

### तक्रार मागे घेण्यास दबाव

दलित अत्याचार प्रतिबंधक कायदयानुसार तक्रार दाखल केल्यानंतर पिडीत व अत्याचारीत व्यक्ती यांच्यातील वा त्यांच्या जातीतील व्यक्ती पोलीसांवर विविध प्रकारे दबाव टाकत असतात. आरोपीच्या जातीतील स्थानिक नेते, राजकीय नेते आपआपल्या परीने प्रकरण मागे घेण्यास विविध कलातृप्त्यांचा अवलंब करत असतात वा विभिन्न प्रकारचे दबाव टाकत असतात (पहा सा.क्र. 4.7)

**सारणी क्रमांक 2:** तक्रार मागे घेण्यास दबाव टाकणाऱ्या व्यक्ती व दबावाचे स्वरुप

| | विवरण | दबावाचे स्वरुप | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | दबाव टाकणाऱ्या व्यक्ती | तक्रार मागे | धमकी | पैशाने तडजोड | साक्षीदारावर दबाव | एकुण |
| 1 | अत्याचार करणारी व्यक्ती | 05 | 03 | 06 | 06 | 20 |
| 2. | अत्याचारीचे नातेवाईक | 18 | 01 | 04 | 05 | 28 |
| 3. | कुंटूंबातील व्यक्ती | 01 | - | 01 | - | 02 |
| 4. | पोलीस प्रशासन | 02 | - | 03 | 01 | 06 |
| 5. | जातीतील व्यक्ती | 02 | - | - | - | 02 |
| 6. | इतर काहीच नाही | - | - | - | - | 42 |
| | एकुण | 28 | 04 | 14 | 12 | 100 |

**स्त्रोत:** प्राथमिक तथ्य

पिडित व्यक्तीने अत्याचार करणाऱ्याविरुध्द पोलीसांत तक्रार नोंदविल्या नंतर त्यांना विविध समस्येला सामोरे जावे लागले. एकुण तक्रारीपैकी 58 % तक्रारीमध्ये आरोपी व आरोपीच्या नातेवाईकांनी तक्रार मागे घेण्यास विविध प्रकारचा दबाव पिडितेवर आणला होता असे निर्दशनास येते. यात अत्याचार करणाऱ्या 5 % व्यक्तीने तक्रार मागे घेण्यास पिडीत व्यक्ती व त्याच्या कुंटूंबावर दबाव टाकला तर 3 % आरोपीने तक्रार मागे न घेतल्यास गंभीर परिणामाना सामोरे जावे लागेल वा जिव घेऊ अशी धमकी दिली. तक्रार मागे घेण्यास 6 % पिडितांना पैशाचे आमिष देण्यात आले तर अत्याचार प्रकरणात साक्षीदारावर दबाब टाकण्यात आला.पिडित कुंटूंबियांना विविध मार्गाने त्रास देण्यास सर्वाधिक 28 % प्रमाण अत्याचारीत व्यक्तीच्या नातेवाईकांचा समावेश होता. आरोपीच्या 18 % नातेवाईकांनी विविध मार्गाचा अवलंब करुन पिडित कुंटूंबावर दबाव टाकला. तर मारहाण व जिवे मारण्याची धमकी पैशाचे अमिष व साक्षीदारावर दबाव टाकुन अत्याचाराचे प्रकरण मिटविण्याचा प्रयत्न करण्यात आला.तर पिडित कुंटूंबातीलच 2 % व्यक्तीने प्रकरण मिटविण्याच्या दृष्टीकोनातुन तक्रार मागे घेण्यास (1%) व पैश्याने तडजोड (1%) करण्यास दबाव टाकल्याचे निर्दशनास आले.

पिडित व्यक्तीवर तक्रार मागे घेण्यास (2%), पैशाने तडजोड (3%) व साक्षीदारांवर दबाव (1%) दबाव आणण्याचा पोलीस प्रशासनाने प्रयत्न केला असल्याचे आढळुन आले.पिडित व्यक्तीने तक्रार मागे घ्यावी या करीता आरोपीने पिडित व्यक्तीच्या जातीतीलच व्यक्तीच्या मार्फत दबाव टाकण्याचा प्रयत्न केला.

### न्यायप्रक्रियेस विलंब

न्याय प्रक्रियेतील विलंबात न्यायधीश, वकील, न्यायालय प्रशासन साक्षीदार व आरोपी यांचा समावेश होतो.

### न्यायाधीश

एखादया प्रकरणाचा न्यायनिवाडा करण्यामध्ये अनेक कारणांपैकी संबंधीत न्यायाधीशाने दिर्घकालीने घेतलेली रजा यामुळे न्यायास विलंब होतो. या व्यतिरिक्त दुसरे कारण म्हणजे रिक्त पदावर न्यायाधीशाची नेमणुक न करणे किंवा दिर्घ

काळापर्यंत पद रिक्त ठेवणे.

**वकील:-** संबंधीत वकील सतत विविध कारणास्तव प्रकरण पुढे ढकलत असतात त्यामुळे न्यायास खुप वेळ लागतो.

**प्रशासन:-** सध्या परिस्थितीस विविध प्रकरणे न्यायालयात जास्त प्रमाणात दाखल होत असल्यामुळे प्रशासकीय कार्य यंत्रणेवर वाढीव केसेसचा ताण येतो. व त्यामुळे प्रक्रियेस वेळ लागतो.

**साक्षीदार:-** साक्षीदार हा सर्वात महत्वाचा कारणीभुत ठरणारा घटक होय. साक्षीदारांच्या अनुपस्थितीमुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. मुख्यत: साक्षीदारास प्रवास व इतर भत्ता न मिळाल्यामुळे साक्षीदार साक्ष देण्यास उत्सुक दिसुन येत नाही.त्यामुळे संबंधीत प्रकरणाच्या न्यायदानास उशिर होतो.

**आरोपी:-** जेव्हा मुख्य आरोपी फरार असतो आणि पोलीस त्यांचा शोध घेऊ शकत नाही. यामुळे न्यायालयीन प्रक्रियेबरोबरच तपासात पण अडथळे येतात.

तपासातील विलंब:-प्रस्तुत संशोधनात पिडित महिला व त्यांच्या कुंटूंबातील व्यक्तीची चर्चा केल्यानंतर असे निर्दशनास आले की, पोलीस तपास अधिकाऱ्यांनी वेळेच्या आत आरोपीवर गुन्हे दाखल केलेले नाही. तर पोलीस विभाग संबंधीत तज्ञाने वेळेवर अहवाल दिला नाही असा दोष देऊन तपासास विलंब झाल्याचे कारण सांगतात. याव्यतीरिक्त पोलीसांनी साक्षीदारास कोर्टापुढे सादर करण्यास अयशस्वी झाल्याचे निर्दशनास येते.

**न्यायप्रक्रियेस विलंब**

न्याय प्रक्रियेतील विलंबात न्यायधीश, वकील, न्यायालय प्रशासन साक्षीदार व आरोपी यांचा समावेश होतो.

**न्यायाधीश:-**एखादया प्रकरणाचा न्यायनिवाडा करण्यामध्ये अनेक कारणांपैकी संबंधीत न्यायाधीशाने दिर्घकालीने घेतलेली रजा यामुळे न्यायास विलंब होतो. या व्यतिरिक्त दुसरे कारण म्हणजे रिक्त पदावर न्यायाधीशाची नेमणुक न करणे किंवा दिर्घ काळापर्यंत पद रिक्त ठेवणे.

**वकील:-** संबंधीत वकील सतत विविध कारणास्तव प्रकरण पुढे ढकलत असतात त्यामुळे न्यायास खुप वेळ लागतो.

**प्रशासन:-** सध्या परिस्थितीस विविध प्रकरणे न्यायालयात जास्त प्रमाणात दाखल होत असल्यामुळे प्रशासकीय कार्य यंत्रणेवर वाढीव केसेसचा ताण येतो. व त्यामुळे प्रक्रियेस वेळ लागतो.

**साक्षीदार:-**साक्षीदार हा सर्वात महत्वाचा कारणीभुत ठरणारा घटक होय. साक्षीदारांच्या अनुपस्थितीमुळे अनेक गंभीर प्रश्न निर्माण होतात. मुख्यत: साक्षीदारास प्रवास व इतर भत्ता न मिळाल्यामुळे साक्षीदार साक्ष देण्यास उत्सुक दिसुन येत नाही.त्यामुळे संबंधीत प्रकरणाच्या न्यायदानास उशिर होतो.

**आरोपी:-** जेव्हा मुख्य आरोपी फरार असतो आणि पोलीस त्यांचा शोध घेऊ शकत नाही. यामुळे न्यायालयीन प्रक्रियेबरोबरच तपासात पण अडथळे येतात.

**तपासातील विलंब:-**प्रस्तुत संशोधनात पिडित महिला व त्यांच्या कुंटूंबातील व्यक्तीची चर्चा केल्यानंतर असे निर्दशनास आले की, पोलीस तपास अधिकाऱ्यांनी वेळेच्या आत आरोपीवर गुन्हे दाखल केलेले नाही. तर पोलीस विभाग संबंधीत तज्ञाने वेळेवर अहवाल दिला नाही असा दोष देऊन तपासास विलंब झाल्याचे कारण सांगतात. याव्यतीरिक्त पोलीसांनी साक्षीदारास कोर्टापुढे सादर करण्यास अयशस्वी झाल्याचे निर्दशनास येते.

**निष्कर्ष**

दलितांवर होणारे अत्याचार प्रतिबंध करण्यासाठी विविध कायद्यांची निर्मिती करण्यात आली. यात ॲट्रासिटी ॲक्ट महत्वाचा मानल्या जातो. या कायदयातील तरतुदीनुसार अत्याचारीत महिलांना न्याय दिला जातो व पोलीसांना या कायदयानुसार कार्यवाही करावी लागते अशी माहिती असणाऱ्या पिडित महिलांची संख्या 32 (32%) आहे काही महिलांना या कायदयातील ठळक तरतुदीची पण माहिती आहे असे निदर्शनास आले आहे. हा कायदा दलितांसाठी आहे या कायदयातील तरतुदीनुसार न्याय मागता येतो वा पोलीस कार्यवाही करतात एवढी त्रोटक माहिती असणाऱ्या पिडीत महिलांचे प्रमाण अत्यल्प आहे.

दलित महिलांनी अत्याचाराविरोधात ॲट्रासिटी ॲक्ट या अंतर्गत तक्रार दाखल केल्यानंतर ती तक्रार मागे घेण्याकरीता अत्याचारीत व्यक्ती, त्याचे नातेवाईक, कुटुंबातील व्यक्ती, पोलीस प्रशासन, जातीतील व्यक्ती इ. प्रयत्न करतात. तसेच तक्रार मागे घेण्याकरीता विविध दबाव तंत्राचा वापर करण्यात येते. प्रस्तुत अध्यायानात तक्रार मागे घेण्या करीता अत्याचारीत व्यक्ती व त्याचे नातेवाईक यांनी तक्रार मागे घेण्याकरीता विविध दबाव तंत्रांचा वापर केलेला आहे. यात धमकी, पैशांनी तडजोड, साक्षीदारावर दबाव इत्यादींचा सामावेश होतो.

न्याय प्रक्रियेस विलंबास न्याय पालिकेवरील कामाचा बोजा, न्यायाधीशची नियुक्ती नसने, वकील, प्रशासन, साक्षीदार, आरोपी व तपासातील विलंब यांचा प्रामुख्याने समावेश होतो. निर्णय प्रक्रियेच्या विलंबनाच्या कारणांचा आढावा घेण्याकरीता किचकट व दिर्घ प्रक्रिया, कायदयातील पळवाटा, पोलीस प्रशासनाचे असहकार्य, इत्यादी मुद्दयास अनुसरुन विश्लेषण केलेले आहे. तर शिक्षा न होण्याच्या कारणांत कायदयाचे कडक अमंलबजावणी न होणे, सवर्णाना असलेला राजकीय आधार, साक्षीदारावर दबाव, इत्यादी कारणांचे विश्लेषण करण्यात आलेले आहे.

**संदर्भसूची**

1. Ministray of Social Justice & Empowerment, Report U/s 21 (4), SCs &
2. Parilimentry committi on welfare of SCs & STs 4 th Report, 2004- 2005, New Delhi P 325
3. People commission against Atrocities on Dalit, draft observation & advises on effective measure to address atrocities against SCs & STs, New Delhi, 2008, P. 4.
4. Subramanian S K, 2007 Political Violence & Police in India, New Delhi, Sage Publication.
5. STs(POA) Act for 2006, New Delhi, 2007, Page7